(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद)

**[१९९६] ३ एस. सी. आर. ८७९**

**तारलोक सिंग**
**- विरुद्ध -**
**विजय कुमार सभरवाल**

**२५ मार्च, १९९६**

**[ के. रामास्वामी आणि जी. बी. पट्टनायक, न्या. न्या.]**

मुदत अधिनियम, १९६३ :

अनुसूची, अनुक्रमांक ५४ - विनिदिर्ष्ट पालनाकरता दावा - मुदतमर्यादा - सुरुवातीस, निरंतर व्यादेशबाबतचा दावा दाखल - नंतर, दावा विनिदिर्ष्ट पालनचा दावा म्हणून दुरुस्तीसाठी वादपत्राच्या दुरुस्तीसाठी दिवाणी प्रकिया संहिता, आदेश ६, नियम १७ नुसार अर्ज दाखल - न्यायालयाद्वारा व्यादेशाचे विलोपन झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विक्री पत्र निष्पादन करण्यात येईल अशी अट घालून विक्रीचा करार- व्यादेशाबाबतचा दावा दिनांक २२.३.१९८६ रोजी निकालात काढण्यात आला - दुरुस्तीकरता अर्ज दिनांक २५.८.८९ रोजी अनुमत करण्यात आला - निर्णय देण्यात आला, विनिदिर्ष्ट पालनकरता दाव्याची, वस्तुतः, दुरुस्ती म्हणून मागणी केली - दावा मुदतबाह्य झाला असेल त्या तारखेपर्यंत ज्या दिनांकाला दुरुस्ती करण्याचे आदेशित करण्यात आले तो दिनांक निर्णायक दिनांक राहील हे सर्वमान्य आहे.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रं. ७०२०/१९९६.

आर. एस. ए. क्रं. २४८५/१९९३ मध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय व आदेश, दिनांक ६.७. ९४ यातून.

अपीलकर्त्यासाठी : यु. आर. ललित, महाबीर सिंघ आणि म्रीदुल अग्गरवाल.

उत्तरवादीसाठी : प्रेम मल्होत्रा.

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आला :

अनुमति देण्यात आली.

आम्ही दोन्ही बाजूंच्या वतीने विद्वान काउन्सेल यांचे म्हणणे ऐकले आहे.

पक्षकारांमध्ये चालू राहिलेल्या विविध कोर्ट खटल्यांशीसंबंधीत सर्व तपशील नमूद न करता, इतकेच नमूद करणे पुरेसे आहे की अपीलकर्ता हा जमिनींचा मालक आहे. उत्तरवादी हा हितसंबंध उत्तराधिकारी आहे. जमिनी अन्यसंक्रामीत करण्यासाठी अपीलकर्त्याद्वारे निष्पादित केलेला, विक्रीचा करारनामा उत्तरवादीच्या वडिलांनीं दिनांक २१ डिसेंबर, १९८४ रोजी केला होता हे सर्वमान्य आहे. प्रलंबित कार्यवाहया लक्षात घेता, दाव्यात दिलेला व्यादेश विलोपीत करण्याच्या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत विक्री पत्र निष्पादन करणे अपीलकर्त्याला जरुरी असेल अशी अट घालून दिनांक १८ ऑगस्ट, १९८४ च्या करारपत्राद्वारे अभिहस्तांतरणाची मुदत आणखी वाढविली. आम्हाला माहिती देण्यात आली की दावा सुरुवातीस खारीज करण्यात आला आणि त्यानंतर पुनर्विलोकन अर्ज सुद्धा दिनांक २२ मार्च, १९८६ रोजी मागे घेतला म्हणून खारीज करण्यात आला. सुरवातीस, उत्तरवादीने निरंतर व्यादेशाकरिता दिनांक २३ डिसेंबर, १९८७ रोजी दावा दाखल केला होता. दाव्याचे रूपांतर दिनांक १८ ऑगस्ट, १९८४ च्या करारनाम्याचे विनिर्दिष्ट पालनकरता दाव्यात करण्यासाठी दिवाणी प्रकिया संहिता, आदेश ६, नियम १७ नुसार अर्ज दाखल करण्यात आला. अर्ज दिनांक १७ जुलै, १९८९ रोजी दाखल करण्यात आला. दिनांक २५ ऑगस्ट, १९८९ च्या आदेशाद्वारे, दुरुस्ती करण्यास अनुमती देण्यात आली. अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात पुनरिक्षण अर्ज, दिवाणी पुनरिक्षण अर्ज क्रं. २७२४/८९ अन्वये, दाखल केला. उच्च न्यायालयाने, दिनांक २९ नोव्हेंबर, १९८९ च्या आदेशाद्वारे, खालील प्रमाणे निर्णय दिला होता :

"न्यायचौकशी न्यायाधीशाने पारित केलेल्या आदेशात मला कोणतीही अवैधता किंवा नियमबाह्यता आढळून येत नाही. तथापि, विकणाऱ्यास, दुरुस्ती केलेल्या वादपत्राच्या अनुसार तो जे लेखी कथन दाखल करेल त्यामध्ये दावा हा मुदतीच्या बाहेर गेला आहे आणि दुरुस्तीसाठी अर्ज ज्या दिनांकास दाखल करण्यात आला त्या दिनांकास देखील दावा मुदतबाह्य होता, असे विनिदिर्ष्ट प्रतिकथन करण्यास मुभा राहील. दुरुस्ती केलेले लेखी प्रतिकथन दाखल केल्यावर, न्यायचौकशी न्यायाधीश योग्य वादप्रश्न काढतील आणि कायद्यानुसार निकालात काढतील."

वरील निर्देश लक्षात घेता, अपीलकर्त्याने वादप्रतिवाद केला आहे कि दावा हा मुदतबाह्य होता. न्यायचौकशी न्यायालयाने ते निष्फळ केले आणि दाव्यात हुकूमनामा दिला. अपील दाखल झाल्यावर, तो कायम करण्यात आला. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने, दिनांक ६ जुलै, १९९४ च्या आदेशाने, ते दुसरे अपील, आर. एस. ए. क्रं २४८५/९३ खारीज केले. अशा तऱ्हेने, विशेष अनुमतीद्वारे हे अपील.

एकच प्रश्न आहे तो म्हणजे : दावा मुदतबाह्य आहे किंवा कसे? करारनामा, दिनांक २१ डिसेंबर, १९८४ च्या अनुसार, विनिदिर्ष्ट पालनाकरिता मुदत वाढविण्यात आली होती, जी स्थगित आदेश ज्या दिनांकास उठविण्यात आला त्या दिनांकापासून १५ दिवसानंतर सुरु झाली. हि आता मान्य केलेली स्थिती आहे कि पुनर्विलोकन याचिका दिनांक २२ मार्च, १९८६ रोजी खारीज करण्यात आली होती. अशा तऱ्हेने, मुदतमर्यादा दिनांक ६ एप्रिल, १९८६ पासून सुरु झाली. त्यामुळे, प्रश्न असा आहे की : विनिर्दिष्ट पालन करण्याबाबतचा दावा मुदतमर्यादेत आहे किंवा कसे? मुदत अधिनियम, १९६३ चा २१, अनुसूची, अनुक्रमांक ५४ खालील प्रमाणे आहे :

"संविदेच्या विनिदिर्ष्ट पालनाकरता, मुदतमर्यादा तीन वर्षे आहे. पालनाकरता नियत केलेल्या दिनांकापासून, किंवा असा कोणताही दिनांक नियत केला नसेल तर, पालन करण्यास नकार देण्यात आला आहे याची वादीला दखल मिळते तेव्हापासून मुदत सुरु होते."

श्री. प्रेम मल्होत्रा, उत्तरवादीच्या वतीने विद्वान काउन्सेल यांनी युक्तिवाद केला की उत्तरवादीने पालन करण्यास नकार दिला होता, त्यामुळे दावा दिनांक २३ डिसेंबर, १९८७ रोजी दाखल करण्यात आले असल्याचे मानले गेले पाहिजे, आणि त्यामुळे, जेव्हा दुरुस्ती करण्यास मुभा दिली होती, तेव्हा त्याचा दावा दाखल करण्याच्या दिनांकाशी परत संबंध जोडला जाईल; जो नकार दिल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या आत दाखल करण्यात आला होता. त्यामुळे, दावा मुदतबाह्य नाही. श्री. यु. आर. ललीत, अपीलकर्त्याच्या वतीने विद्वान ज्येष्ठ काऊन्सेल यांनी युक्तिवाद केला की उच्च न्यायालयाने दिलेली मुभा लक्षात घेता, अपीलकर्ता मुदतीचा युक्तिवाद करण्यासाठी हक्कदार आहे. १९८६ पासून ३ वर्षे संपल्यानंतर दाखल केलेला दावा हा मुदती बाहेर गेलेला आहे. प्रश्न असा आहे की : मुदतमर्यादा केव्हा पासून सुरु झाली? व्यादेश  उठविल्यानंतर १५ दिवसाच्या आत संविदेचे पालन करावयाचे होते हि मान्य केलेली स्थिती लक्षात घेता, मुदत दिनांक ६ एप्रिल, १९८६ रोजी सुरु होते. दिनांक २५ ऑगस्ट, १९८९ च्या आदेशाने, निरंतर व्यादेशाबाबतचा दावा हा विनिदिर्ष्ट पालन करण्याबाबतच्या दाव्यात रूपांतरित करण्यात आला होता ही स्थिती लक्षात घेता, दावा दिनांक २५, ऑगस्ट, १९८९ रोजी दाखल करण्यात आला असे मानले गेले पाहिजे आणि दावा स्पष्टपणे मुदतबाह्य होता. आम्हाला अपीलकर्त्याच्या भूमिकेत प्रभाव आढळतो. आम्हाला वाटते की पक्षकारांनी करारनाम्याद्वारे संविदेचे पालन करण्यासाठी तारीख निश्चित केली होती. त्यामुळे, मुदत दिनांक ६ एप्रिल, १९८६ पासून सुरु होते. दिनांक २३ डिसेंबर, १९८७ रोजी केवळ व्यादेशासाठी ठेवलेला दावा काहीही उपयोगी  पडणार नाही किंवा त्या दिनांकापासून मुदत सुरु होणार नाही, दोहोंपैकी एकही नाही. निरंतर व्यादेशबाबतचा दावा विनिदिर्ष्ट पालनाकरता दाव्यापासून वेगळा आहे. विनिदिर्ष्ट पालनाकरता दावा, वस्तुतः, दिनांक १२ सप्टेंबर, १९७९ रोजी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६, नियम १७ नुसार दाखल केलेल्या दुरुस्ती अर्जाद्वारे केला होता. अर्जावर आदेश दिल्यानंतरच तो प्रवर्तित होईल. दुरुस्ती दिनांक २५ ऑगस्ट, १९८९ रोजी आदेशित झाली होती, त्यामुळे दावा  मुदतबाह्य झाला असेल त्या तारखेपर्यंत ज्या दिनांकाला दुरुस्ती करण्याचे आदेशित करण्यात आले

तो दिनांक निर्णायक दिनांक राहील हे सर्वमान्य आहे. त्यामुळे दाव्यात हुकूमनामा काढण्यामध्ये कनिष्ठ न्यायालये योग्य नव्हते.

तदनुसार, अपील अनुमत करण्यात येते. दावा खारीज करण्यात येतो. वाद खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील अनुमत.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.